# अपार्टमेंट डीड/ तबदीलपत्र

आज वार ------------------------, दिनांक -----, माहे सप्टेंबर, इसवी सन. २०२६, ते दिवशी पुणे येथे.

(१)श्री. संतोष बाबु वरक,
(पॅन : AJSPV6687P),
वय : अंदाजे ३५ वर्षे, धंदा : व्यवसाय,
(२)सौ. ललीता संतोष वरक,
(पॅन : ARTPV0022H),
वय : अंदाजे ३५ वर्षे, धंदा : व्यवसाय,
दोघेही राहणार : फ्लॅट नंबर १०६, वृंदावन ऋषीकेश,
सर्व्हे नंबर १७, शिवणे, पुणे : ४११ ०२३.

} लिहून घेणार

यांसी,

सौ. प्रतिक्षा संजय डाबीर,
(पॅन : **AFXPD8577R**),
वय : अंदाजे ५३ वर्षे अंदाजे, धंदा : व्यवसाय,
राहणार : फ्लॅट नंबर २, श्रीपाद अपार्टमेंट,
सर्व्हे नंबर ५, हिस्सा नंबर १/१, वारजे, पुणे : ४११ ०५८.

} लिहून देणार

- रहिवासी गाळ्यामधील हक्कांच्या तबदीली/विक्रीसाठी या व्यवहाराच्या प्रत्यक्ष ठरलेल्या मोबदल्याची किंमत रक्कम रूपये ७७,००,०००/-
- चालू बाजारभावाची किंमत रक्कम रूपये --------------/- /-

- मुद्रांक मोबदला किंमतीवर जी प्रत्यक्ष बाजारभावापेक्षा जास्त आहे तीवर रक्कम रुपये ५,३९,०००/- चा.

कारणे रहिवासी गाळ्यामधील मालकी हक्कांच्या विक्री/तबदीलीपत्राचा दस्त लिहून देतो ते येणेप्रमाणे :-

(१)संपूर्ण मिळकतीचे वर्णन :-

(क) तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधक हवेली, मे. तहसिलदार साहेब, हवेली, पुणे यांचे मुलकी हद्दीमधील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीतील गांव मौजे वारजे, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर ५ हिस्सा क्रमांक १/१, (यांसी सुसंगत सीटी सर्व्हे क्रमांक ४१६१) यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर २६ आर पैकी ३५० चौरस मीटर्स ही मिळकत, यांसी चतु:सिमा :-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | रस्ता आणि स्वेदगंगा सोसायटीची मिळकत, |
| दक्षिणेस | : | सर्व्हे नंबर १४४, |
| पश्चिमेस | : | सर्व्हे नंबर १४४, |
| उत्तरेस | : | श्री. रामस्वर्थ एच यादव यांची मिळकत, |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक वर्णनाची स्थावर जमीन मिळकत, त्यातील जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, इत्यादी वस्तूसहित, वहिवाटीचे, रस्ता वापरण्याचे हक्कांसह, तसेच सदर मिळकतीस पूर्वापार उपलब्ध असलेल्या हवा, पाणी, उजेड वगैरे सर्व इजमेंटचे, रस्ता वापरण्याचे वगैरे सर्व हक्क, निधिनिक्षेप यासह दरोबस्त अशी मिळकत.

(ख) या रहिवासी गाळ्यामधील हक्कांच्या तबदीली/विक्री बाबतच्या दस्ताचा विषय असलेल्या मिळकतीचे वर्णन :-

वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **श्रीपाद अपार्टमेंट्स कंडोमिनिअम** या इमारतीमधील **पहिल्या** मजल्यावरील **अपार्टमेंट/फ्लॅट/ रहिवासी गाळा क्रमांक २**, यांसी क्षेत्र ८७.६२ चौरस मीटर्स (म्हणजेच ९४२.८१ चौरस फूट) बिल्टअप अधिक लगतचे टेरेस यांसी क्षेत्र १२.३९ चौरस मीटर्स (म्हणजेच १३३.३१ चौरस फूट) तसेच एक चारचारकी तसेच एक

दुचाकी पार्कींग स्पेस सह, तसेच **२५% समाईक अविभक्त हिश्श्या सहित** हि फ्लॅट मिळकत;

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत, त्यातील सर्व दगड, वीटा, लोखंडी दारे, खिडक्या, लाकूड फाटा इत्यादी सर्व तदंगभूत वस्तुंसहित व सदर मिळकतीतील जाण्यायेण्याचे, रस्त्याचे वापराच्या हक्कासहित व इजमेंटचे सर्व हक्कासहित दरोबस्त. सदरील रहिवासी गाळा मिळकतीस यापुढे या लेखामध्ये संक्षेपाने सदरील **विषयांकित मिळकत/सदरील मिळकत** असे संबोधण्यात आले आहे.

(२) वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेली एकूण मिळकत ही श्री. अशोक शंकरराव क्षिरसागर, यांच्या मालकी हक्क व वहिवाटीची असून, त्यानुसार सदरील मिळकत मालकांच्या नावांची नोंद वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाणे वर्णन केलेल्या मिळकतीच्या ७/१२ उता-यावर रीतसर झालेली आहे, काही योग्य व संयुक्ति कारणांसाठी सदरील श्री. अशोक शंकरराव क्षिरसागर, यांनी वर कलम (१) (क) मध्ये विशषत्वाणे वर्णन केलेली मिळकती संबंधी दिनांक २९/०९/२००६, इसवी रोजीच्या विकसनकरारन्वये मे. के. के. एंटर प्राईजेस, (यापुढे सोईसाठी प्रमोटर्स अथवा सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स असा उल्लेख) नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री. लिशा मंगेश कंक, यांना सदरील जमीन मिळकत विकसनासाठी तसेच त्यास अनुसरुन कुलमुखत्यारपत्र लिहून दिले होते, सदरील विकसनकरारनामा व कुलमुखत्यारपत्राची नोंद मा. दुय्यम निबंधक हवेली क्रमांक १३, पुणे यांच्या कार्यालयामध्ये अनुक्रमे अनुक्रमांक ६३१७/२००६ व ६३१८/२००६, अन्वये रीतसर झालेली आहे, तथापि सदरील नोंदणीकृत विकसनकरारनामा व कुलमुखत्यारपत्राच्या दस्तामध्ये विकसनकरारनाम्याचे क्षेत्र ३५० चौरस मीटर्स ऐवजी चुकुन ३७१.७४ चौरस मीटर्स असे नजरचुकीने नोंद झाले होते, व सदरील चुकदुरुस्ती करण्यासाठी सदरील मिळकत मालक व सदरील प्रमोटर्स यांनी दिनांक १५/०१/२००७, इसवी रोजी सदरील सदरील अशा प्रकारे सदरील श्री. गणेश मुरलीधर काळे, व श्री. मिलींद बाजीराव चाकणकर, यांनी सदील वर उल्लेख केलेल्या सदरील नोंदणीकृत विकसनकरारनामा व कुलमुखत्यारपत्राच्या दस्तास चुक दुरुस्ती दस्त केलेला असुन सदरील सदरील चुकदुरुस्ती पत्रांची नोंद मा. दुय्यम निबंधक हवेली क्रमांक १३, पुणे यांच्या कार्यालयामध्ये अनुक्रमे अनुक्रमांक ३४३/२००७ व ३४४/२००७, अन्वये रीतसर झालेली आहे.

(३) सदरील प्रमोटर्स यांनी वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या मिळकतीवर पुणे महानगर पालिकेकडून बांधकाम नकाशे क्रमांक सीसी/१९६३/०७, दिनांक ०१/१०/२००७, मंजूर करुन घेतले तसेच सदरील प्रमोटर्स यांनी सब डीव्हीजनल ऑफीसर, पुणे सब डीव्हीजन, पुणे १, यांचे कडून

सदरील ३५० चौरस मीटर्स जमीन मिळकतीचा वापर अकृषीक कारणांसाठी करणे कामी आदेश क्रमांक एनए/एसआर/II/ ४७८/२००७, दिनांक ०२/०६/२००८, प्राप्त केलेला आहे.

(४) वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या मिळकतीवर इमारतीचे बांधकाम चालू असताना सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स यांनी सदरील वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाणे वर्णन केलेली रहिवासी गाळ्याची मिळकत दिनांक २१/०६/२००८, इसवी रोजीचे करारनामा दस्तान्वये सदरील लिहून देणार तसेच त्यांचे वडील श्री. शशिकांत सदाशिव भाले, यांना विक्री करण्याचे मान्ये व कबूल केले, सदरचा करारनामा हा मा. दुय्यम निबंधक, हवेली क्रमांक २०, पुणे यांचे कार्यालयात दिनांक २४/०६/२००८, इसवीरोजी अनुक्रमांक ५५८२/२००८ या अनुक्रमांकान्वये रितसर नोंदविलेला आहे.

(५) सदरील प्रमोटर्स यांनी सदरील जमीन मिळकतीवर इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले असून बांधकाम नियंत्रण कार्यालय, पुणे मनपा कडून दिनांक ०२/०१/२००९, रोजी भोगवटापत्र क्रमांक बीसीओ/४४२(०५११८), प्राप्त केलेले आहे.

(६) सदरील सदरील लिहून देणार तसेच त्यांचे वडील श्री. शशिकांत सदाशिव भाले, यांनी सदरील वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाणे वर्णन केलेल्या रहिवासी गाळ्याचा संपूर्ण मोबदला सदरील प्रमोटर्स यांना देवून सदरील मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा स्विकारला आहे व त्यानुसार सदरील सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स यांनी दिनांक २१/१२/२०१५, इसवी रोजीचे डीड ऑफ असाईनमेंट दस्तान्वये सदरील लिहून देणार तसेच त्यांचे वडील श्री. शशिकांत सदाशिव भाले, यांना लिहून व नोंदवून दिलेला आहे, सदरचा डीड ऑफ असाईनमेंट हा मा. दुय्यम निबंधक, हवेली क्रमांक १३, पुणे यांचे कार्यालयात दिनांक २२/१२/२०१५, इसवीरोजी अनुक्रमांक १०९९२/२०१५ या अनुक्रमांकान्वये रितसर नोंदविलेला आहे.

(७) सदरील लिहून देणार त्यांचे वडील व सदरील रहिवासी गाळ्याचे एक धारक श्री. शशिकांत सदाशिव भाले, यांचे दिनांक इंदुर येथे दिनांक १०/०७/२०१८ इसवीरोजी निधन झाले असून, सदरील कै. श्री. शशिकांत सदाशिव भाले, यांना वारस म्हणून दोन मुलगे नामे (१) श्री. भूषण शशिकांत भाले व (२) श्री. रवी शशिकांत भाले व एक विवाहित मुलगी म्हणजेच सदरील लिहून देणार नामे सौ. प्रतीक्षा संजय डबीर, असे आहेत. काही योग्य व संयुक्तिक कारणांसाठी सदरील वारसांपैकी (१) श्री. भूषण शशिकांत भाले व (२) श्री. रवी शशिकांत भाले, यांनी दिनांक

१६/१२/२०१८ इसवीरोजीच्या हक्कसोड पत्र दस्तांन्वये, आपल्या सख्खा बहिणीच्या म्हणजेच सदरील लिहून देणार यांच्या वरील भाऊ बहिणीच्या नाते संबंधी प्रेमापोटी, त्यांना वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाणे वर्णन केलेल्या सदरील रहिवासी गाळ्याच्या मिळकती मध्ये त्यांना वारसा हक्काने प्राप्त झालेले सर्व हक्क व अधिकार हे सदरील लिहून देणार यांच्या लाभात सोडून दिले असून, सदरील हक्कसोडपत्राच्या दस्ताची नोंद ही मा. दुय्यम निबंधक हवेली क्रमांक २२, पुणे यांच्या कार्यालयामध्ये त्याच दिवशी अनुक्रमांक १९९७१/२०१८, अन्वये रीतसर नोंदविण्यात आला आहे.

(८) सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स यांनी सदरील वर कलम (१) (क) मध्ये विशेषत्वाणे वर्णन केलेली मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत तीमधील गाळेधारकांची महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट, १९७० अन्वये प्रसाद अपार्टमेंट कंडोमिनिअम स्थापन केली असून, त्या संदर्भात दिनांक ०४/०३/२०२२ इसवी रोजी डीड ऑफ डिक्लरेशन, सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स, तसेच सदरील मिळकत मालक यांनी लिहून व नोंदवून ठेवलेले असून सदरील डीड ऑफ डिक्लरेशनची नोंद मा. दुय्यम निबंधक हवेली क्रमांक १६, पुणे यांच्या कार्यालयामध्ये अनुक्रमांक ३७६३/२०२२, अन्वये रीतसर नोंद झालेली आहे.

(९) सदरील लिहून देणार व त्यांच्या वर उल्लेख केलेल्या वडीलांनी वर उल्लेख केलेल्या दिनांक २१/०६/२००८, इसवी रोजीच्या नोंदणीकृत करारनाम्यानुसार सदरील रहिवासी गाळ्याच्या मिळकतीचा संपूर्ण मोबदला सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स, यांना दिला व त्यानुसार सदरील प्रमोटर्स/डेव्हलपर्स, यांनी दिनांक ०७/०६/२०२२, इसवी रोजी अपार्टमेंट डीड सदरील लिहून देणार, यांच्या लाभात लिहून दिला, सदरील अपार्टमेंट डीडच्या दस्ताची नोंद मा. दुय्यम निबंधक हवेली क्रमांक १६, पुणे यांच्या कार्यालयामध्ये दिनांक ०८/०६/२०२२, इसवी रोजी अनुक्रमांक ९८४४/२०२२, अन्वये रीतसर नोंद झालेली आहे.

(१०) अशा प्रकारे तेव्हापासून सदरील लिहून देणार यांचे वर कलम (१)(ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळा मिळकतीमध्ये तसेच अपार्टमेंट मधील अविभक्त हिश्श्यामध्ये यांमध्ये वर विशेषत्वाने वर्णन केल्यानुसार हक्क प्राप्त असून सदरील लिहून देणार यांच्या नावाची नोंद **सदरील रहिवासी गाळ्याच्या मिळकतीच्या पुणे मनपा करपावती व वीजदेयकावर मिळकत मालक/धारक म्हणून नोंद झालेली आहे,** अशा रितीने सदरील लिहून देणार यांना प्राप्त झालेले हक्क हे या दस्ताचे वेळी आज रोजी पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, मार्केटेबल, वादरहित व बोजारहित आहेत.

(११) काही योग्य व संयुक्तिक कारणांसाठी सदरील विषयांकित रहिवासी गाळयाचे मिळकतीमध्ये सदरील लिहून देणार यांनी त्यांना वर विशेषत्वाने लिहिल्याप्रमाणे प्राप्त झालेले हक्क व अधिकार हे अन्य त्रयस्त व्यक्तिंना विक्री/तबदिल करण्याचे ठरविले असता त्याबाबत सदरील लिहून घेणार यांना माहिती मिळाल्यावरुन सदरील लिहून घेणार यांनी सदरील मिळकत एकूण **रक्कम रुपये ७७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्त्याहत्तर लाख फक्त)** इतक्या रकमेच्या मोबदल्यामध्ये कायमखुष खरेदी घेण्याची तयारी दर्शविली, त्याबाबत लिहून देणार, लिहून घेणार यांच्यात वाटाघाटी होऊन, लिहून देणार यांनी सदरच्या एकूण मोबदल्यात लिहून देणार यांचे सदरील विषयांकित मिळकतीमध्ये / रहिवासी गाळयामध्ये सदरील लिहून देणार यांना वर विशेषत्वाने लिहिल्याप्रमाणे प्राप्त झालेले सर्व मालकी हक्क व अधिकार सदरील, लिहून घेणार यांचे नावे कायमखुष खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले, तसेच सदरील लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांना लिहून देणार यांचे सदरील विषयांकित मिळकतीमधील / रहिवासी गाळ्यातील सर्व हक्क व अधिकार हे पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहित व बोजारहित व मार्केटेबल आहेत असा भरंवसा दिला आहे.

(१२) सदरील लिहून देणार यांना सदरील वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाणे प्राप्त झालेले स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीचे हक्क हे या दस्ताचे वेळी आज रोजी पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहित व बोजारहित आहेत असा पूर्ण भरंवसा सदरील लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांना यापूर्वीही दिला आहे व या लेखानेही देत आहेत. तसेच सदरील लिहून देणार यांच्या सदरच्या रहिवासी गाळ्याबाबत कसल्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास, त्याकामी अन्य त्रयस्त व्यक्तिंनी कोणी कसल्याही प्रकारची हिल्ला हरकत निर्माण केल्यास सदरील लिहून देणार यांनी त्याचे संपूर्ण निवारण स्व:खर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर करण्याचे मान्य व कबूल केले आहे.

(१३) सदरच्या अपार्टमेंट डीड/तबदीलपत्राचे दस्ताने सदरील लिहून देणार यांनी त्यांना वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेला रहिवासी गाळ्याच्या मिळकतीमध्ये वर विशेषत्वाने उल्लेख केल्याप्रमाणे प्राप्त झालेले हक्क व अधिकार सदरील लिहून घेणार यांचे नावे सदरच्या एकूण मोबदल्यामध्ये म्हणजे एकूण **रक्कम रुपये ७७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्त्याहत्तर लाख फक्त)** या मोबदल्यामध्ये सदरची मोबदल्याची रक्कम सदरील लिहून घेणार यांचेकडून या लेखामध्ये यापुढे भरण्याचे कलमामध्ये विशेषत्वाने लिहील्याप्रमाणे स्विकारुन आज रोजी हे कायमखूष तबदीलपत्र लिहून दिले असून त्याबाबत उलट तबदीलपत्र करार अगर ते परत घेण्याची बोली नाही.

आता सदरील लिहून घेणार या सदर वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळ्यामध्ये/अपार्टमेंटचे कायमखुश खरेदीदार मालक व धारक या नात्याने असणाऱ्या हक्कांचे / अधिकारांचे कायमखुष खरेदीदार, पूर्ण मालक झाले असून सदरील लिहून घेणार यांनी सदर अपार्टमेंटचे नियमांस आधीन राहून सदरच्या अपार्टमेंटचा /रहिवासी गाळ्याचा पूर्णपणे मन मानेल तसा पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने उपभोग घ्यावा अगर विक्री विल्हेवाट करावी त्यास सदरील लिहून देणार तसेच त्यांचे वाली वारस तसेच त्यांचेतर्फे इतर कोणीही, केव्हाही, कसल्याही प्रकारची हिल्ला हरकत करणार नाही, अशी हिल्ला हरकत कोणीही, केव्हाही केल्यास त्याचे संपूर्ण निवारण स्व:खर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर करुन देण्याची जबाबदारी सदरील लिहून देणार यांनी स्विकारली आहे.

(१४) सदर वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळ्यामधील सदरील लिहून देणार यांस या दस्ताचे तारखेपूर्वी वर विशेषत्वाने लिहील्याप्रमाणे प्राप्त झालेले हक्क व अधिकार हे पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहित व बोजारहित असल्याचा भरवसा सदरील लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांना दिला असून सदरच्या रहिवासी गाळयावर सदरील लिहून देणार यांनी यापुर्वी सदरील लिहून देणार यांचे शिवाय इतर कोणाचाही केव्हाही, कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण केलेला नाही तथापि असा कोणताही बोजा निर्माण केला असल्याचे निषन्न झाल्यास त्यांची संपूर्ण परतफेड आपल्या खर्चाने व आपल्या जबाबदारीवर करण्याचे सदरील लिहून देणार यांनी मान्य केले असून त्यापासून सदरील लिहून घेणार यांना मुक्त ठेवण्याचे मान्य व कबूल केले असून त्याकामी सदरील लिहून घेणार यांचे कसल्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई स्वत:चे खर्चाने व स्वत:चे जबाबदारीवर करुन देण्याचे सदरील लिहून देणार यांनी मान्य व कबूल केले आहे व त्याची कोणतीही तोशीष सदरील लिहून धेणार यांना न लागू देण्याचे मान्य व कबूल केले असून, लागल्यास त्याची संपूर्ण भरपाई करण्याचे मान्य व कबूल केले आहे.

(१५) सदर वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळयाचा प्रत्यक्ष व खुला ताबा लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांना या लेखाचे वेळी संपूर्ण मोबदला स्विकारुन दिलेला असून असा प्रत्यक्ष व खुला ताबा सदरील लिहून घेणार यांना सदरील लिहून देणार यांचेकडून यालेखाचे वेळी अथवा त्यापूर्वी प्राप्त झाला आहे. ताब्याबाबत कसल्याही प्रकारची तक्रार नाही. वेगळ्या ताबे पावतीची आवश्यकता नाही.

(१६) सदर वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळयाचे पुणे मनपा करपावती, महाराष्ट्र विद्युत महामंडळाकडील तसेच इतर सर्व संबंधित कागदपत्रांवर सदरील लिहून घेणार यांनी त्यांचे नाव योग्य त्या अधिकारामध्ये योग्य त्या ठिकाणी दाखल करून घ्यावे, त्याकामी सदरील लिहून देणार यांचे सही संमतीची आवश्यकता भासल्यास सदरील लिहून देणार हे अशी सही, संमती संबंधित अधिकाऱ्यासमोर स्वत: हजर राहून देतील तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर सह्या करतील व त्याकामी सदरील लिहून घेणार यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करतील.

(१७) सदर वर कलम (१)(ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळ्याचे सर्व सरकारी, निमसरकारी, स्थानिक व इतर सर्व कर आणि इलेक्ट्रिक बिल सदर गाळ्याचा ताबा सदरील लिहून घेणार यांना दिल्याचे तारखेपर्यंतचे, सदरील लिहून देणार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे दिलेली आहेत, तसेच त्याबाबतची सर्व बीले पावत्या सदरील लिहून घेणार यांचकडे या दस्तावर सह्या करतेवेळी दिल्या आहेत. तसेच सदर वर कलम (१)(ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळयाबाबत भविष्यात सदर गाळ्याचा ताबा सदरील लिहून घेणार यांना दिल्याचे तारखेपर्यतची कोणतीही सरकारी, निमसरकारी स्थानिक कर अथवा इतर देण्याची बाकी राहिल्याचे निष्पन्न झाल्यास ते देण्याची सर्व जबाबदारी सदरील लिहून देणार यांनी स्विकारलेली आहे. तसेच सदर वर कलम (१)(ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळयाचे संदर्भात वर विशेषत्वाने वर्णन केल्याप्रमाणे ताबा मिळाल्याचे तारखेपासून त्यापुढे दयावे लागणारे अशा प्रकारचे सर्व कर, बिल सदरील लिहून घेणार यांनी आपल्या जबाबदारीवर संबंधित अधिकाऱ्याकडे भरली आहेत / भरण्याचे मान्य केले आहे.

(१८) सदरच्या संपूर्ण मोबदल्याची **रक्कम रुपये ७७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्त्याहत्तर लाख फक्त)** ही सदरील लिहून घेणार यांनी सदरील लिहून देणार यांना आज रोजी अथवा या दस्ताचे तारखेपूर्वी खाली विशेषत्वाने लिहिल्याप्रमाणे दिला आहे.

| क्र. | रूपये | तपशिल |
|---|---|---|
| १) | १०,००,०००/- | लिहून घेणार यांनी दिनांक २१/०८/२०२६ इसवी रोजी आरटीजीएस संदर्भ क्रमांक बीएआरबीआर५२०२६०८२१००९८०७९४, त्यांच्या बँक ऑफ बडौदा, कर्वेनगर शाखेमधून सदरील लिहून देणार यांच्या बँक |

| | | |
|---|---|---|
| २) | ६७,००,०००/- | ऑफ इंडिया, वारजे शाखा, पुणे या बँकेत जमा केले ते, डीमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर/बँकर्स चेक क्रमांक ---------------, दिनांक --------, इसवीरोजीचा ------, बॅक, -----, शाखा, पुणे. (सदरील लिहून घेणार यांच्या सदरील रहिवासी गाळा खरेदीकरण्यासाठी लोन अकाऊंट वर काढलेले असून) तो सदरील लिहून देणार यांना दिला तो. |
| **एकूण** | **७७,००,०००/-** | **(अक्षरी रुपये सत्त्याहत्तर लाख फक्त)** |

येणेप्रमाणे सदरील लिहून देणार यांना सदरील लिहून घेणार यांचेकडून या व्यवहाराचा संपूर्ण मोबदला वर विशेषत्वाने लिहिल्याप्रमाणे पावला असून भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नाही वेगळया भरणा पावतीची आवश्यकता नाही, सदरील व्यवहाराचा आयकर कायद्याप्रमाणे उद्गम कर कपात (टीडीएस) हा सदरील लिहून देणार हे स्वत: या दस्ताच्या नोंदी नंतर योग्य त्यामुदतीत आयकर खात्याकडे भरणार आहेत.

(१९) सदर अपार्टमेंट डीड तबदीलपत्राच्या दस्ताचा स्टॅम्पाचा, टायपिंगचा, रजिस्ट्रेशनचा तसेच इतर सर्व अनुषंगिक खर्च हा सदरील लिहून घेणार यांनी केलेला आहे.

(२०) सदर वर कलम (१) (ख) मध्ये विशेषत्वाने वर्णन केलेल्या रहिवासी गाळ्यामधील सदरील लिहून देणार यांस या दस्तापूर्वी असलेले हक्क हे सदरील लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांच्या लाभात तबदील केले असल्याने महाराष्ट्र मुद्रांक कायदा, १९५८ मधील आर्टिकल २५ मधील तरतूदी प्रमाणे या तबदीलपत्राचे दस्तामधील मोबदल्याच्या किंमतीवर म्हणजे रक्कम रुपये ७७,००,०००/- या किंमतीवर जी प्रचलित बाजारभावाने होणारी रक्कम अथवा प्रत्यक्ष ठरलेला मोबदला यापैकी जास्त असणाऱ्या रकमेवर एकूण रक्कम रुपये ५,३९,०००/- चा मुद्रांक ई-चलनाद्वारे अदा केलेला आहे.

येणेप्रमाणे तबदीलपत्राचा लेख सदरील लिहून देणार यांनी सदरील लिहून घेणार यांना राजीखुषीने व अक्कलहुशारीने लिहून दिला असून त्याखाली लिहून घेणार, लिहून देणार यांनी आपापल्या सह्या आपापल्या अधिकारात सदरील साक्षीदारांसमक्ष आज रोजी केल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| | | सौ. प्रतिक्षा संजय डाबीर<br>**लिहून देणार** |
| | | (१)श्री. संतोष बाबु वरक |
| | | (२) सौ. ललीता संतोष वरक<br>**लिहून घेणार** |

**साक्षिदार :-**

(१)

सही :-

नांव :-

पत्ता :-

(२)

सही :-

नांव :-

पत्ता :-

--------------------------